# ग्रामपालिका घोटी बु.॥

## ता.इगतपुरी जि.नाशिक

दि. 15/05/2026

**जाहीर ई निविदा सुचना क्र. 02/सन 2026-2027 (प्रथम प्रसारण)**

प्रशासक,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपालिका **घोटी बु.॥** ता. इगतपुरी जि. नाशिक येथे ग्रामपालिका येथे विविध विकास कामी करण्यासाठी कामासाठी ई – निविदा २ लिफाफा पद्धतीने महाराष्ट्र शासनाच्या आवश्यक त्या विभागाकडील योग्य त्या वर्गातील **नोंदणीकृत ठेकेदाराकडून** कडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बांधकामाचा कालावधी | निविदा फी/बयाना | नोंदणी वर्ग | निविदा कालावधी | निविदा उघडविण्याचा संभाव्य दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Reparing For Dyanjyoti Library Building At Ghoti Bk. Tal Igatpuri Dist. Nashik. | 364739 | 6 महिने | 500 | सु.बे.अ | दि.15/05/2026 दुपारी 01:45 ते दि.21/05/2026 दुपारी 01:45 पर्यंत | दि.22/05/2026 दुपारी 01:45 वाजता. |

**सूचना :-३**

**निविदे सोबत खालीलप्रमाणे कागदपत्र जोडणे आवश्यक राहील.**

**लिफाफा क्र.- 1**

**सा.बां. विभाग/ जिल्हा परिषद नोंदणी प्रमाणपत्र, पन कार्ड, GST, आयकर प्रमाणपत्र, पी टी इ सी/ पी टी आर सी प्रमाणपत्र अद्यावत चलनसह, संबंधित काम केल्याचा अनुभवाचा दाखला, कामपूर्ण केल्याचे दाखले, तांत्रिक मनुष्यबळ यादी, मशिनरी यादी, ग्रामपंचायतकडे कुठलेही काम प्रलंबित नसल्याबाबतचा दाखला, साईट विजिट केल्याचा दाखला, उपविभागीय बांधकाम विभाग नाशिक यांच्या कडील काम प्रलंबित नसल्याचा दाखला व इतर आवश्यक कागदपत्रे,** निविदा प्रक्रियेमध्ये सर्व टप्प्यावर सादर केलेली सर्व माहिती खरी असल्याचे 500 रुपयांच्या स्टँपवर हमीपत्र.

**लिफाफा क्र.- 2**

BOQ .xls एक्सेल फॉरमेट मध्ये असणे आवश्यक.

**अटी व शर्ती**

1. **वरील निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर दिनांक 15/05/2026 रोजी दुपारी 01:45 पासून ते दिनांक 21/05/2026 रोजी दुपारी 01:45 पर्यत ऑनलाईन पद्धतीने सादर करता येतील.**
2. **निविदा फी व बयाना रक्कम ऑनलाईन पद्धतीने शासनाच्या https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर जमा करावी.**

3. **निविदा शक्य झाल्यास दिनांक 22/05/2026 रोजी दुपारी 01:45 वाजता ग्रामपालिका घोटी बु.॥ता.जि.नाशिक यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील तथापि निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलण्याचा अधिकार आणि कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपालिका घोटी बु.॥ ता.जि.नाशिक यांनी राखून ठेवला आहे. व त्याचा निर्णय सर्व निविदा धारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.**
4. निविदा फी व बयाना रक्कम ऑनलाईन https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे.
5. दोन किंवा जास्त समान न्यूनतम देकार आल्यास System Generated BOQ Comparative Chart (संगणकीकृत तुलनात्मक तक्ता) नुसार न्यूनतम देकाराची निविदा स्वीकारण्यात येईल.
6. निविदा सादरीकरण वरील प्रमाणे दोन लिफाफा पद्धतीने (Technical & Financial) ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.
7. प्रत्यक्ष कामाचा स्थळाची पाहणी करून निविदा भरणेत यावी.
8. निविदा भरणेच्या वेळेनंतर कोणत्याही निविदाधारकास माघार घेता येणार नाही.
9. माघार घेणे, करारनाम्यावर सही न करणे, कार्यालयीन प्रक्रियेस विलंब होईल अशी कोणतीही कृती निविदाधारका कडून झाल्यास संबंधित निविदाधारकाची संपूर्ण फी, बयाना रक्कम जप्त करणेत येईल.
10. सुरक्षा अनामत 1% निविदा मंजुरी नंतर लगेच व 2.5% बिलातून देणे आवश्यक आहे.
11. निविदा - 2% (वजा दोन टक्का) पेक्षा कमी भरल्यास शासन निर्णयानुसार परफॉर्मन्स सिक्युरिटी डिपॉझिट डी.डी.अथवा ऑनलाईन भरणा निविदा मंजुरी नंतर 5 दिवसात जमा करणे बंधनकारक राहील. तसेच करारनामा करून देणे आवश्यक राहील.
12. कामाचे देयक मूल्यांकन अथवा मंजूर रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल त्या प्रमाणे देय राहील.
13. कामाचे देयक अनुदान प्राप्त झाल्यानंतर अदा करण्यात येईल.
14. निविदा विक्री व स्वीकृती फक्त ऑनलाईन पद्धतीनेच होईल. कोणतेही कारण न दर्शविता एक किंवा सर्व ऑनलाईन निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपालिका **घोटी बु.**॥ ता. इगतपुरी यांनी राखून ठेवला आहे.
15. शासकीय नियमानुसार आवश्यक कपाती (GST, TDS,उपकर, INCOME TAX,विमा ) करण्यात येईल.
16. निविदा स्वीकारणे फक्त ऑनलाईन पद्धतीनेच करण्यात येईल. कोणतेही मूळ कागदपत्र, प्रमाणपत्र जमा करणेसाठी कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. तथापी न्यूनतम देकार देणाऱ्या निविदाधारकाला सर्व अपलोड केलेली कागदपत्र ग्रामपालिका अधिकारी, ग्रामपालिका घोटी बु.॥ ता. इगतपुरी जि. नाशिक यांचे कडून पडताळणी करून घेणे बंधनकारक राहील.
17. सुरक्षा अनामत परतावा हा लेखा परीक्षण पूर्ण झाल्यानंतर अदा करण्यात येईल.
18. कामाचे देयके हे उप अभियंता इवद यांच्या मुल्यांकन फोर्म नं 65 पूर्णतवाचा दाखला अहवालावरून देण्यात येईल.

19. प्रस्तुत निविदा सुचनेमधील काम न्यूनतम निविदाधारकास मिळालेनंतर सदर कामाचा कार्यारंभ आदेश निर्गमित झालेचे दिनांकापासून 1 महीन्याच आत कोणतीही अडचण नसताना प्रत्यक्ष काम सुरु न केलेस नियमाधीन काम काढून घेणेची कार्यवाही केली जाईल.

20. निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना, शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती **https://mahatenders.gov.in/** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

21. निविदा धारकाने 10% पेक्षा जास्त कमी दराची निविदा भरल्यास निविदा रकमेच्या 09% रक्कम व कंत्राटदाराची बोलीची रक्कम यामधील फरकाच्या रक्कमे एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष अतिरिक्त सुरक्षा अनामतीचा धनाकर्ष पाकीट क्र 2 मध्ये स्कन करून जोडणे अनिवार्य राहील. सदर कमी दराबाबत समर्थनीय स्पष्टीकरण सादर करावे लागेल.

22. निविदा दिनांक 22/05/2026 रोजी सकाळी वाजता ग्रामपालिका घोटी बु.॥ ता. इगतपुरी जि.नाशिक येथे किंवा काही तांत्रिक अडचण आल्यास योग्य तो निर्णय लगेच कळविण्यात येईल.

Digitally signed by
BAJIRAO PRABHAKAR
DANGE
Date: 2026.05.15
12:51:38

Digitally signed by
DNYANESHWAR MOHANRAO
KARHALE
Date: 2026.05.15 12:52:49

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपालिका घोटी बु.॥ ता. इगतपुरी जि. नाशिक**

**प्रशासक**
**ग्रामपालिका घोटी बु.॥ ता. इगतपुरी जि. नाशिक**

Signature Not Verified

Digitally signed by BAJIRAO PRABHAKAR DANGE
Date: 2026.05.15 13:00:08 IST
Location: Maharashtra-MH